MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawarta®

Issue-21, Vol-08, Jan. to March 2018

International Multilingual Research Journal

ANNIVERSARY CELEBRATIONS
6th
ANNIVERSARY
2018

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Editor
Dr.Bapu G.Gholap

25

# 'अस्मितादर्श' मधील साहित्यचिंतन (१९६८ ते १९७८)

प्रा. सर्जेराव रणखांब
(मराठी विभाग)
देगलूर महाविद्यालय देगलूर

***********

साहित्याच्या अंगाने येणाऱ्या प्रश्नांची चर्चा व एकूण साहित्यविषयक मर्मांची उकल करणारे काही लेख अस्मितादर्शमधून आलेले आहेत. या लेखांचे स्वरुप त्यांची वैशिष्ट्ये यांची चर्चा करणे अभिप्रेत आहे. अस्मितादर्शमधून ज्या साहित्य-संस्कृती विषयक चर्चा झाल्या आहेत. त्यातून नेमकी कोणती साहित्यविषयक प्रवृत्ती स्पष्ट होते ? याचाही अभ्यास येथे अभिप्रेत आहे.

'अस्मितादर्श' च्या पहिल्याच वर्षी (त्यावेळी अस्मिताहे नाव होते) महाराष्ट्रातील आज उद्याचा सांस्कृतिक संघर्ष आणि वाङ्मयीन समस्या या विषयावर एक चर्चा झाली. या चर्चेत वा.ल.कुलकर्णी, म.भि.चिटणीस, मे.पुं.रेगे, म.ना.वानखेडे, प्रा.रा.ग.जाधव आदी अभ्यासकांनी मुक्त चर्चा केली आहे. (घअस्मिताङ हेमंत अंक, १९६७, डिसेंबर)

साठोत्तरी काळात मराठी साहित्यात प्रचंड बदल घडून आला. या बदलाची कारणे आपल्या सामाजिक-सांस्कृतिक परिघातच शोधावी लागतात. या पार्श्वभूमीवर प्रा.रा.ग.जाधव व मे.पु.रेगे यांची चर्चा महत्वाची आहे. ललित वाङ्मयाच्या अधिष्ठानी सांस्कृतिक मूल्यकल्पना असतात आणि ललित वाङ्मयाचे अध्ययन-अध्यापन व रसग्रहण-मूल्यमापन ही या मूल्य कल्पनांवर आधारित असते म्हणून या मूल्यकल्पनेच्याद्वारे प्राचीन व अर्वाचिन मराठी वाङ्मयाच्या अध्ययन-अध्यापन व रसग्रहण-मूल्यमापन ही या मूल्यकल्पनांवर आधारित असते. म्हणून या मूल्यकल्पनेच्याद्वारे प्राचीन व अर्वाचीन मराठी वाङ्मयाच्या अध्ययन-अध्यापनासंबंधी व रसग्रहण-मूल्यमापनाविषयी काही प्रश्न निर्माण झाले आहेत काय ? असा प्रश्न प्रा.रा.ग.जाधवांनी उपस्थित केलेला आहे. यावर मे.पु.रेगे यांच्या उत्तराचा रोख या प्रश्नांची व्यवस्थित चर्चा करणारा आहे. नवबौध्दांच्या साहित्यात वास्तविक सामाजिक चित्रण प्रामाणिकपणे झाले तर नव्या प्रकारचं मराठी साहित्य निर्माण होईल या प्रकारचे साहित्य दुसरा कोणताही वर्ग निर्माण करु शकणार नाही, परंतु कुठे तरी या साहित्याचा आणि परंपरागत मूल्याविरुध्द बंड करुन उठलेल्या मराठी साहित्याचा संबंध जुळून येईल. म्हणून पुढचं काही वर्षे सुध्दा विद्रोहाची राहतील, किंवा हा कालखंड भारतीय समाजाचा पुनर्घटना होण्यासाठी विद्रोहाचाच राहिला पाहिजे असे मे.पुं.रेगे सूचित करतात. तसेच नवीन मूल्यकल्पना रुजविण्यासाठी 'खंबीरपणे परंपरागत साहित्यावर टिका करावी. कोणत्या दृष्टीने त्यातील मूल्ये त्याज्य आहेत हे दाखवून द्यावे कारण अशा प्रकारचा घrocustnessङ असल्याशिवाय जिवंत साहित्य निर्माण होणार नाही'.१

उत्तमपणे साहित्याची निर्मिती करण्यासाठी नवबौध्दांनी तटस्थवृत्तीने साहित्याची निर्मिती करावी. या साहित्याच्या मूल्यमापनासाठी नवीन टिकाकाराने या वर्गाची अनुभूती समजून घेतली पाहिजे, अशा या चर्चेचा सूर आहे.

दलित साहित्य परंपरेच्या संदर्भात वा.ल.कुलकर्णी यांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांचा वारसा मानावा असे सांगितले आहे. त्यांच्या मते तुकाराम आणि केशवसुत यांचे जवळचे नाते आहे. म्हणून तेही या परंपरेत त्यांना महत्वाचे वाटतात. तसेच या चर्चेत दलित साहित्यातील मिथ्यक, दलित साहित्याचे रसग्रहण याविषयीचे संदर्भही अधोरेखित झालेले आहेत.

स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याच्या संदर्भात 'अस्मितादर्श' मधून काही निरीक्षणे नोंदविली गेली आहेत. १९६० ते ६८ या काळातील मराठी वाङ्मय : एक चर्चा (दिवाळी ८) व स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्य म्हणजे दिशाहीन साहित्य (दिवाळी-७१) हे दोन लेख या संदर्भात स्वातंत्र्योत्तर (परिसंवाद) साहित्याची उकल करणारे आहेत.

घस्वातंत्र्योत्तरकालीन मराठी साहित्य म्हणजे, दिशाहीन साहित्यङ या परिसंवादातून विषयाच्या अनुकूल, प्रतिकूल विचार प्रकट झाले आहेत. या परिसंवादात प्रा.वा.ल.कुलकर्णी, प्रा.नरहर कुरुंदकर, वामन इंगळे, प्रा.सुधाकर अहंकारी, श्री.म.य.दळवी आदी अभ्यासकांनी भाग घेतलेला आहे.

स्वातंत्र्योत्तरकालीन मराठी साहित्य म्हणजे दिशाहीन साहित्य असे म्हणता येणार नाही कारण साहित्य दिशा ठरवून निर्माण होत नसते. तर साहित्यातून दिशा सूचित होते, असा अभिप्राय प्रा.वा.ल.कुलकर्णी यांनी दिला आहे. लोकशाही समाजवाद ह्यापासून तो थेट अस्तित्ववादापर्यंत या काळात उद्घोष होत असला तरी त्यातील एकही विचारप्रणाली जनमाणसाचा ठाव घेऊ शकलेली नाही परंतु लोकशाहीच्या उदयाने या काळात सामान्यातील, सामान्यांचा त्यांची अस्मिता जागृत होण्याला वाव मिळाला, पददलितांचा वर्ग हळुहळू जागा होऊ लागला, या काळात नव्या समस्या निर्माण झाल्या असल्या

अस्तित्ववादाचा आश्रय घ्यावा लागला.

३) किर्केगार्स, यास्पर्स, हायडेग्गर, वर्थ व सार्त्र हे सहा तत्त्ववेत्ते अस्तित्ववादी आहेत, पण प्रत्यक्षात वाङ्मयात अस्तित्ववाद आणणारा म्हणूनच सार्त्र.

४) 'अस्तित्ववाद हा प्रामुख्याने आत्मतत्वावर आधारलेला आहे. आत्मतत्व हेच अंतिम सत्य आणिआंतरिक संघर्ष ही अस्तित्ववादाची मुलभूत वस्तुस्थिती आहे.

५) अस्तित्व म्हणजे कोणत्याही प्रकारचे, वस्तूचे अथवा व्यक्तिमानाचे असणे होय. या असण्याला वस्तुमात्रातील ईश्वरतत्वामुळेड अर्थपूर्णता येते.

६) व्यक्तीचे बंदिस्त आत्मविश्व व व्यक्तीची जाणीव एवढेच अस्तित्ववादाला मान्य आहे. अस्तित्ववादाची अशी वैशिष्ट्ये या लेखातून गोचर होतात.

आंबेडकरवाद आणि मराठी साहित्य (राजा जाधव-नोव्हें.-डिसें.७७) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व मराठी साहित्य (अक्षयकुमार काळे-७७ नोव्हें-डिसें.) यांचे लेख आंबेडकरवादी विचारानुसार मराठी साहित्याचे परिशीलन करणारे आहेत; पण स्थूलमानाने लघुलेखाचे स्वरुप असल्यामुळे नुसती उदाहरणे निरीक्षणाशिवाय आलेली आहेत.

साहित्यक्षेत्रात बांधिलकी हा शब्द प्रचलित आहे. इंग्रजीतल्या कमिटमेंट वरुन तो मराठीत आला आहे. नारायण सुर्वे यांनी कलावंतांची सामाजिक बांधिलकी हा लेख (दिवाळी ७२) लिहिला आहे.

कलावंत, समाज या दोहोंची बांधिलकी याला त्यांनी महत्व दिले आहे. या तिन्हींच्या समन्वयातून सुंदर कलाकृतींचा जन्म होत असतो असे सांगितले आहे. व्यक्ती ही समाजाची सभासद आहे व कोणत्याही क्षेत्रात माणूस हाच खरा केंद्रबिंदू आहे. या माणसांच्या परस्पर अतूट संबंधातून सामाजिक बांधिलकी तयार होते, पण तिचे स्वरुप संकुचित नसून सत्य, सौंदर्य व क्रांतीशी ती निगडीत आहे असे अधोरेखित केले आहे. कलावंताची डोळस, सामाजिक बांधिलकी ही एकाच वेळी त्याला सत्याकडे घेऊन जाते, सौंदर्याकडे घेऊन जाते. या दोन्हींच्या पूर्तीसाठी होणाऱ्या क्रांतीकारक संघर्षातच तिची वाढ, तिची कलात्मक मूल्ये व तिचा प्राण मुक्त होऊशकतो. ती खऱ्या अर्थाने उन्हाची वारसदार होऊ शकते.२ यावरुन आजच्या कलाक्षेत्राच्या संदर्भात तिची किती उपयुक्तता आहे हे लक्षात येते.

संदर्भ :-

१) रंग.मे.पु.एक चर्चा-अस्मितादर्श, डिसेंबर १९६७ पृ. ३०
२) कुलकर्णी वा.ल.परिसंवाद, अस्मितादर्श, दिवाळी १९७१ पृ. ३
३) सुर्वे नारायण-कलावंताची सामाजिक बांधिलकी-अस्मितादर्श-१९७२ पृ. ६७.

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded